# स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व भटके विमुक्त

**डॉ. विजय जयसिंग माने,** सहा. प्राध्यापक,

यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ सोशियल वर्क, जकातवाडी,सातारा, mv7080@gmail.com.

---

**प्रस्तावना:**

नुकताच आपण भारताचा प्रजासत्ताक दिन साजरा केला. हा उत्सव साजरा करत असताना देशात ज्या ज्या क्षेत्रांमध्ये आपण प्रगती केलेली आहे त्याची मांडणी विविध दृकश्राव्य माध्यमांच्या मार्फत लोकांपर्यंत पोहोचत होती. भारताने विज्ञान तसेच तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये अफाट प्रगती केलेली आहे. शिक्षण, आरोग्य, व वाहतुकीच्या सुविधा तसेच शेती व अशा अनेक क्षेत्रांमध्ये भारताने झपाट्याने विकास साधलेला आहे. या विकासामुळे भारत येत्या काळामध्ये जागतिक महासत्ता बनेल असे चित्र निर्माण होताना दिसत आहे. या बदलांचा व प्रगतीचा वापर करून भारतीय समाज विकासाकडे व प्रगतीकडे वाटचाल करू लागला आहे. परंतु हे होत असताना याच देशातील भटका विमुक्त समाज मात्र अजून या ना त्या कारणाने विकासा पासून व प्रगती पासून मैलोन् मैल दूर आहे.

**भटके-विमुक्त:**

नैसर्गिक आपत्तींच्या मुळे मानवी समाजाचे स्थलांतर प्राचीन काळापासून जगभर होत राहिले आहे. स्थलांतर करण्याची ही घटना मानवी भटकंतीची पहिली पायरी होय असे समजायला हरकत नाही. काळाच्या ओघा मध्ये मानवाने शेतीचा शोध लावला व तो स्थिर जिवन जगू लागला. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या तसेच शिक्षणाच्या प्रगतीने मानव एक ठिकाणी कायमस्वरूपी आपली वस्ती करून स्थिर झाला. त्यामुळे नैसर्गिक आपत्तीमुळे निर्माण झालेली भटकंती ही तत्कालीन स्वरूपाची समजली गेली. परंतु युद्ध, व्यापार, धार्मिक व सामाजिक बहिष्कार या घटकांचा विचार करतात स्वसंरक्षणासाठी व स्वतःच्या अस्तित्वासाठी स्थलांतराचा मार्ग स्वीकारायला लागलेला समुदाय देखील भारतीय समाज व्यवस्थेमध्ये फार मोठ्या प्रमाणात दिसून येतो. हा समुदाय उपजीविकेसाठी पुढील काळात भटक्यांचे जीवन जगायला लागला व त्यातूनच विविध प्रकारच्या भटक्या समुदायांची निर्मिती झाली असावी. या समुदायातील भटकंतीचे हे चित्र या देशातील इंग्रज सत्तेपर्यंत च्या काळात व तिथून पुढे ऐंशी नव्वदच्या दशकापर्यंत चालत आलेले आपल्याला दिसून येते.

ब्रिटिशांच्या आगमनानंतर त्यांना इथल्या नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर करून त्यांच्या औद्योगीकरणाला रसद पुरवायची होती, व त्यामुळे त्यांनी त्यांच्या सोयीसाठी काही कायदे केले. त्या कायद्यांमुळे इथल्या भटक्या विमुक्त समाजातील मंडळींच्या जल, जंगल, जमीन या नैसर्गिक साधनसंपत्तीच्या वापर करण्यावर मोठ्या प्रमाणात निर्बंध लागले. यामुळे इंग्रज सत्ताधारी व भटका विमुक्त समाज यांच्यामध्ये संघर्ष सुरू झाला.

**गुन्हेगारी कायदा व भटके-विमुक्त:**

१८७१ साली या देशात ब्रिटिशांनी जगाच्या पाठीवर इतरत्र कुठेही नसणारा अमानवी व अमानुष अशा स्वरूपाच्या गुन्हेगारी कायद्याची निर्मिती केली. त्यामुळे देशातील १९८ भटक्या जमातींना गुन्हेगार जमाती म्हणून त्यांनी घोषित केले. या कायद्याअंतर्गत ब्रिटिश यंत्रणेला या जमातीच्या लोकांना बंदिस्त तिन तारेच्या कुंपणात डांबून ठेवता आले. पर्यायाने भटक्या विमुक्त समाजाला आपले जीवन हे पारतंत्र्यात जगावे लागू लागले. पुढे या गुन्हेगारीचा शिक्का मारून बंदिस्त केलेल्या समुदायाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देखील मुक्तता मिळालेली नव्हती, त्यांना या तीन तारेतून मुक्त होण्यासाठी १९५२ साल उजाडावे लागले. या तीन तारेच्या कुंपणात मुक्त झालेल्या समुदायाला भारतामध्ये भटके-विमुक्त म्हणून संबोधले जाऊ लागले. गुन्हेगारी कायद्याच्या जोखडातून व तीन तारखेच्या वसाहतीतून हे लोक जरी मुक्त झाले असले तरी त्यांच्याकडे पाहण्याचा गावगाड्यातील लोकांचा तसेच प्रस्तावित समाजातील लोकांचा दृष्टिकोन मात्र बदलला नाही. इंग्रजांनी या भटक्या-विमुक्तांच्या भोवती निर्माण केलेले संशयाचे वर्तुळ भारतीय समाज माणसावर तसेच असल्याचे जाणवते. अर्थातच या भटक्या विमुक्त जमातीतील लोकांवर होणारे अन्याय अत्याचार हे आजही पूर्णता नाहीसे झालेले नाहीत. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर डॉक्टर

बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेची निर्मिती केली. त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या तत्त्वांचा भारतीय राज्यघटनेमध्ये स्वीकार करून इथल्या विषमतावादी समाजव्यवस्थेने भटक्या विमुक्तांवर लादलेले विविध निर्बंध संपवण्यासाठी विविध तरतुदी केल्या. या तरतुदींच्या आधारे मागासलेल्या भटक्या-विमुक्त समाजाच्या विकासाबरोबरच स्त्री पुरुष समानता, अस्पृश्यता निर्मूलन, कामगार कल्याण व इतर सामाजिक न्यायाला अनुसरून विविध कायदे समाजात प्रस्थापित केले.

**भारतीय समाज व्यवस्था व भटका विमुक्त समाज:**

भारतीय समाजव्यवस्थेत, जातीव्यवस्था, वर्ण व्यवस्था, धर्मव्यवस्था व त्यास अनुसरून असणाऱ्या प्रथा, परंपरा, रूढी, संकेत व यावर आधारित असणारी सामाजिक व आर्थिक विषमतावादी समाजव्यवस्था ही भारतीय समाजाच्या विकासाला मारक ठरत आली आहे. भारतामध्ये प्रामुख्याने जगाच्या पाठीवर इतरत्र कुठे नसलेली समाज व्यवस्थेची रचना ही जाती व वर्णव्यवस्थेवर आधारलेली आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार वर्णनानुसार श्रमाचे विभाजन करण्यात आले आहे. अशा वर्णव्यवस्थेवर व जातिव्यवस्थेवर आधारलेल्या समाजा मध्ये प्रत्येक जाती-जमातीची एक स्वतंत्र रूढी परंपरा असलेली दिसून येते. याला अनुसरूनच या प्रत्येक जाती जमातीकडे उदरनिर्वाहासाठी व आपल्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी काम करण्याची देखील एक स्वतंत्र पध्दती होती व काही प्रमाणात आत्ता देखील ती अस्तित्वात आहे. या जातिव्यवस्थेच्या वर्णव्यवस्थेच्या बाहेर भारतीय समाज व्यवस्थेमध्ये एक फार मोठा भटका समाज आहे. आज अनेक कारणांमुळे जातिव्यवस्थेच्या सामाजिक दुरी वाढलेल्या आहेत तसेच आर्थिक विषमता ही टोकाला पोहोचलेली आहे. अशातच कोणतीही नैसर्गिक अथवा मनुष्यनिर्मित आपत्ती येते तेव्हा गावकुसाबाहेरच्या तुटलेल्या, जगण्याच्या साधनांसाठी झगडणाऱ्या भटक्या विमुक्त समाजावर आणि विशेषता त्यांच्या स्त्रियांवर आपत्ती चा घाला बसतो. मुळातच भटक्या-विमुक्तांच्या जगण्याची परवड संपलेली नाही अशा परिस्थितीत स्त्रियांच्या हाला प्रस्तावना पारावार राहिलेला नाही. भटक्यांची आर्थिक व्यवहार हे आजच्या काळात उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक साधनसंपत्तीच्या अधीन राहिलेले नाहीत तर जमीनदारांच्या श्रीमंतांच्या सावकारांच्या मेहरबानीवर राहिलेले आहेत

हा समाज आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी वेगवेगळी कामे करत होता व आजही करत आहे. हि भटक्या समाजातील मंडळी गावोगावी फिरून करमणुकीचे खेळ करत होती व प्रस्थापित समाजाची करमणुक काम करत होते. तर दुसऱ्या बाजूला काहींनी आपले देव आपल्या डोक्यावर घेऊन त्यांच्या माध्यमातून आपल्या उदरनिर्वाहाची सोय केली होती. याच पद्धतीने अस्वल, साप, माकड, बैल, पोपट व तत्सम प्राण्यांचा वापर करमणुकीसाठी किंवा भविष्य सांगण्याच्या नावाखाली करून भटके आपला उदरनिर्वाह करत होते.

भारतात भटक्या-विमुक्तांची लोकसंख्या सोळा कोटी असल्याचे तर महाराष्ट्रात दीड कोटी असल्याचे सांगितले जाते. महाराष्ट्रातील या दीड कोटी भटक्या समाजातील लोकसंख्येपैकी निम्मे भटके हे निव्वळ सतत स्थलांतर करणारे आहेत. यामध्ये मोठ्या प्रमाणात देवदेवतांच्या नावाने भीक मागणारे व त्या सदृश्य उपजीविकेसाठी वेगवेगळे व्यवसाय करणाऱ्यांची संख्या फार मोठी आहे.

रेणके आयोगाच्या २००८ च्या अहवालानुसार दारिद्र्यरेषेखालील जगणे वाट्याला आलेल्या भटक्यांची संख्या या समाजात 84 टक्के असल्याचे तसेच 98 टक्के लोक भूमिहीन असल्याचे नोंदवले गेले आहे. बहुतांशी लोकांकडे आपले नागरिकत्व सिद्ध करण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रेही नाहीत त्यामुळे त्यांना शासनाच्या योजनांचा लाभ घेता येत नाही किंवा मिळत नाही. या समाजातील अपवादात्मक मंडळींनी बँकेमध्ये आपली खाती उघडलेली दिसून येतात. त्यामुळे जवळ-जवळ 98 टक्के लोकांना बँकेचे कसल्याही प्रकारचे अर्थसाह्य मिळत नाही. तसेच हे लोक त्यांच्या अस्थायी व अस्थीर व्यवसायामुळे सतत स्थलांतर करत असून पालावर किंवा अस्थाई स्वरूपाच्या झोपड्यांमध्ये राहतात. हा भटका विमुक्त समाज देशातील सगळयात दुर्लभ दुर्लक्षित घटक असून तो सर्वाधिक निरक्षर, गरीब व साधन हिन वर्ग आहे.

**भटक्या विमुक्तांची उपजीविकेची साधने:**

भटक्या समाजामध्ये प्रामुख्याने प्राण्यांचा वापर करून आपली उपजीविका करणारे काही विशिष्ट समूहदाय होते. यामध्ये प्रामुख्याने अस्वल घेऊन फिरणारे दरवेशी होते, साप, मुंगुस व अजगर यांचा खेळ करणारे गारुडी होते, माकडाच्या मदतीने करमणूक करून खेळ करणारे माकड वाले होते, बैल घेऊन फिरणारे नंदी बैल समाजातील लोक होते जे भविष्य सांगून माणसांना स्वप्न दाखवणारे होते. तसेच अंगभूत लवचिकतेचा वापर करून तसेच दोरी व इतर साहित्याचा वापर करून करमणुकीचे खेळ करणारा डोंबारी व कोल्हाटी समाज, देवासाठी आपल आयुष्य वेचणारा व त्याची सेवा करण्यासाठी आयुष्यभर झटणारा वाघ्या मुरळी समुदाय हे सातत्यानं भटकंती करूनच आपला उदरनिर्वाह करत होते. वैदू सारखा समुदाय औषधी वनस्पती कंदमुळे देऊन समाजाची वैद्यकीय गरज आजीही भागवतात तर दुसऱ्या बाजूला गोंधळी समाजातील लोक अंबाबाईच्या नावानं गोंधळ जागरण घालून स्थिर समाजाच्या अध्यात्मिक गरजा भागवत आहेत व त्या बदल्यात मिळणाऱ्या भिक्षेवर आपला उदरनिर्वाह करत आहेत. हा संपूर्ण समुदाय भटका व अनेक रूढी परंपरा च्या मध्ये गुरफटून अशिक्षित अडानी राहिलेला आहे. वैज्ञानिक प्रगतीमुळे व विकासाच्या नावाखाली करमणुकीची वेगवेगळी माध्यमं उपलब्ध झाल्यामुळे या मंडळींच्या खेळाकडे माणसं दुर्लक्ष करू लागलीत. सर्व प्रकारच्या दृकश्राव्य माध्यमांच्या मदतीने भविष्य देखील आम्हाला घरपोच उपलब्ध व्हायला लागले असल्यामुळे या भटक्यांच्या कडून भविष्य ऐकण माणसांनी टाकून दिल आहे.

मायबाप सरकारने वन्य प्राण्यांच्या संरक्षणासाठी कायदे केले परंतु तेच कायदे या भटक्या समुदायातील जी मंडळी प्राण्यांचा वापर करून आपली उपजीविका करत होते त्यांच्या मुळावरच उठले. सामाजिक स्थित्यंतरामुळे व इतर अनेक कारणांमुळे गावगाड्यातील बारा बलुतेदार अठरा अलुतेदार तसेच भटका विमुक्त समाज यांची एकमेकावर जि उपजीविका चालत होती ती आज कालबाह्य झालेली आहे. पारंपरिक कला कौशल्यांवर आधारलेले भटक्या विमुक्त जमातींचे व्यवसाय कालबाह्य झालेले आहेत. त्यामुळे या भटक्या जाती-जमातींना खेड्यात जगणं अशक्य होऊ लागला आहे. परिणामी गेल्या काही वर्षापासून या विविध भटक्या विमुक्त जाती जमाती शहराकडे येऊ लागल्या आहेत. बहुतेक भटक्या विमुक्त जाती जमातीतील लोक हे शिक्षनाच्या अभावी मिळेल ते काम करून आपले वा आपल्या कुटुंबाची पोट भरताना दिसतात. उपजीवेकेच्या स्पर्धेत शिक्षण व इतर अनेक महत्वाच्या गोष्टी मागे पडतात

**भटक्या विमुक्तांची सद्यस्थिती:**

परंपरागत व्यवसायात उपजीविकेची साधने नसल्यामुळे हा समाज शहरांमध्ये स्तलांतरित होताना दिसतोय. आज अनेक शहराच्या झोपडपट्ट्यांन मध्ये, रेल्वे स्टेशन व रेल्वे रुळाला लागून, गटाराच्या काठाला, धोकादायक वळणाच्या जवळ, उग्र घाणेरड्या वासाचा जवळ, सार्वजनिक बंदिस्त संडास जवळ आपल्या राहुट्या उभ्या करून ही माणसं आज राहत आहेत. उदरनिर्वाहासाठी वेगवेगळे मार्ग शोधत आहेत. त्यांच्याकडे शिक्षण नाही त्यामुळे आधुनिक ज्ञान विज्ञानाची कौशल्य त्यांना आत्मसात करता आलेली नाहीत. परिणामी शहरी संस्कृती मध्ये गुजराण करण्यासाठी या जमातींना अनेक कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागते. उपजीविकेची पारंपरिक साधने संपुष्टात आल्यामुळे आज या समाजातील मंडळी फुगे व प्लास्टिकच्या वस्तू, स्वयंपाक घरातील किरकोळ वस्तू, चाकुला धार लावणे, छत्र्या दुरुस्त करणे, झाडपाल्याचे औषध देणे, केसावर साहित्य विकण्याचे, जत्रांमध्ये कपडे विकण्याचे, फण्या कंगवे व इतर कलाकुसरीच्या वस्तू विकून तसेच यात्रांमध्ये व गावोगावी फिरून गोंदण्याचा व्यवसाय करून आज हा समाज आपली उपजीविका करत आहे. देशी दारूच्या दुकानांमध्ये ग्लास विसळून, शहरातील भंगार प्लास्टिक गोळा करून या भटक्या विमुक्त समाजातील स्त्री पुरुषांना आपली उपजीविका भागवावी लागते.

**भटका विमुक्त समाज व त्यांच्या स्त्रिया:**

स्त्री मग ती कोणत्याही समाजातील असो भारतीय व्यवस्थेमध्ये तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा पुरुषसत्ताक चष्म्यातूनच राहिलेला आहे. त्यांना सातत्याने दुय्यमत्वाची, कनिष्ठ, उपभोग्य वस्तू, अशीच वागणूक दिलेली आहे. तसेच चूल व मूल या दोन गोष्टीं पुरतीच मर्यादित यांची भूमिका आहे असेल ठरवून टाकलेले आहे. सवर्ण समाजातील स्त्रियां पेक्षा मागास भटक्या विमुक्त स्त्रियांवर कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक अत्याचार अन्याय

अधिक प्रमाणात होताना दिसतात. अज्ञान अंधश्रद्धा रूढी परंपरा यांच्या गर्तेत अडकलेल्या या समाजातील स्त्रियांना माणूस म्हणूनही स्थान नाही. भटक्या विमुक्त जाती जमातीतील स्त्रियांना जन्मताच अशुभ मानले गेले जाते अपवाद काही समुदाय सोडले तर. स्त्री मग ती कोणत्याही समाजातील असो जन्मताच तिच्यावर घडणाऱ्या दुय्यम, कनिष्ठ, परावलंबीतत्वाच्या संस्कारांमुळे ती स्वतःला त्यादृष्टीनेच लेखते व आपलं दुय्यमत्व मान्य करून काम करत असते. साधारणतः भटक्या विमुक्त समाजातील स्त्रियां ज्या वातावरणात ज्या अवस्थेत राहतात, वाढतात, जगतात व समस्यांना तोंड देतात त्यामुळे त्यांनी मानसिकतेने आपलं दास्यत्व स्वीकारलेल आहे.

पारंपारिक व्यवसाय व उद्योगधंदे संपुष्टात आल्यामुळे स्वभाविकच या भटक्या समाजातील स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने अर्थार्जन करण्यासाठी घरा बाहेर पडावे लागते. कुटुंबाचे पालन पोषण करण्यासाठी हातभार लावावा लागतो. स्त्री व पुरुष एकत्र कमाई करत असले तरी मिळालेल्या मिळकतीवर मात्र पुरुषांचाच संपूर्ण हक्क असतो. त्यामुळे ती कष्ट करूनही कमावणारी असूनही परावलंबित्वाचे, पुरुषप्रधान व्यवस्थेतील जीवन जगताना दिसते. तिला विचारांचे, आर्थिक, सामाजिक अधिकार बहुतांशी वेळेला नकारलेले आहेत.

**भटका विमुक्त समाज व त्यांची मुले:**

भटक्या विमुक्त समाजातील मंडळी आजच्या घडीला उपजीविकेच्या साधनांची पूर्तता करण्यासाठी घराबाहेर पडलेले आहेत. बहुतांश मंडळी अल्प साक्षर किवा अशिक्षित आहेत. त्यामुळे ती रोजंदारीवर मोलमजुरीची कामे करून आपली उपजीविका भागवतात. एका ठिकाणी कामाची हामि नसल्यामुळे यांची भटकंती सुरु आसते. या सगळ्याचा मुलांच्या संगोपनावर व शिक्षणावर परिणाम होत राहतो. मुले लहान असतील तर या समाजातील स्त्रिया ती मुलं आपल्या झोळीत घेऊन पाठीवर बांधून काम करत असताना व कामाच्या ठिकाणी घेऊन जाताना दिसतात. बरेच वेळा घरातील मोठी मुले आई-वडलांच्या अनुपस्थितीत आपल्या लहान भावंडांचा सांभाळ करतात. भटकंतीमुळे व घरातील जबाब्दार्यामुळे या मुलांच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होताना दिसतोय.

समाजातील सर्व घटकांपर्यंत शिक्षण पोहचविण्यासाठी शासनाने मोफत शिक्षणाचा अधिकार, शिक्षणाचे सार्वत्रिकरण, शिक्षण आपल्या दारी, अनौपचारिक शिक्षण असे विविध कार्यक्रम राबविले आहेत. अपवादात्मक बदल झालेले दिसून येतायत परंतु त्याचे प्रमाण फार कमी आहे. शासनाने एवढे प्रयत्न करून देखील हा समाज शैक्षणिक दृष्टया वंचितच राहिला आहे. परंतु शिक्षणाचा अभाव व भटकी जीवन पद्धती त्यामुळे भटक्या विमुक्त समाजाची मुले विकासाच्या मुख्य प्रवाहा पासून फार लांब आहेत. या समाजाचे शिक्षणाचे प्रमाण फार कमी असल्यामुळे तसेच विविध प्रकारचे दाखले नसल्यामुळे त्यांना शासनाच्या विविध योजनाचा लाभ घेता येत नाही आणि म्हणूनच हा समाज मागासलेलाच आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते कि शिका, संघटित व्हा आणि संघर्ष् करा. पण हा समाज जर शैक्षणिक दृष्टया अतिमागास असेल तर संघटनाचे व संघर्षाचे महत्व कसे समजणार यांना.

त्यांच्या कुटुंबामध्येच जर कोणी शिकलेला नसेल तर शिक्षणाचे महत्व व शिक्षणामुळे होणार विकास त्यांच्यापर्यंत पोहोचलेला नाही. मुलींच्या बाबतील तर शिक्षणाची दयनीय अवस्था आहे कारण त्यांची लग्न खुप कमी वयात केली जातात. मुलींचे लग्न करून मोकळ होणे हा विचार त्यांचे पालक करीत असतात. मुळात पालकच अशिक्षित असल्याने शिक्षणाचा फायदा चांगले आयुष्य जगण्यासाठी होतो हेच त्यांना समजलेले नाही. रूढी व परंपरा सांभाळण्यातच व्यस्त असलेला हा भटका-विमुक्त समाज शिक्षण व विकास याकडे डोळसपणे पहातच नाही. या सगळ्याचा परिणाम समाजातील मुलांच्यावर विघातक पद्धतीने होताना दिसतोय.

**सारांश:**

आजही भटक्या विमुक्त समाजाची लोक हलाखीचे जीवन जगत आहेत. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून या जाती-जमातींच्या विकासासाठी फारसे प्रयत्न करताना कोणतेही राज्य व केंद्रीय सरकार दिसत नाही. या भटक्या विमुक्त समाजाच्या विकासासाठी म्हणून तोंडदेखले राष्ट्रीय व राज्य पातळीवरील सरकारे काम करत असल्याचे भास होतात. आतापर्यंत या समाजाच्या अभ्यासासाठी अनेक अभ्यास गट, केंद्रीय व राज्य पातळीवरील आयोग तसेच समित्या स्थापन करण्यात आलेले आहे. परंतु या सर्व समिती आयोगांनी सादर केलेल्या

अहवालावर व शिफारशींवर कोणत्याही सरकारने गांभीर्याने विचार केलेला आहे असे दिसत नाही. या भटक्या जाती-जमातींच्या भवताली ब्रिटिश साम्राज्याने उभे केलेले तीन तारेची कुंपणे स्वतंत्र भारत सरकारने काढून टाकली असली तरी प्रशासकीय पातळीवर, कायदा व सुव्यवस्थेची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणा तसेच मुख्य प्रवाहातील समाजाच्या मानसिकतेत या समुदायांच्या बाबतीत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी अपयशी ठरलेले दिसून येत आहे.

भटक्या विमुक्त समाजातील हे लोक सुद्धा या देशाचे नागरिक आहेत, त्यांना सुद्धा जगण्याचा संविधानिक अधिकार आहेत हे आपण विसरता कामा नये. त्यामुळे केंद्र व राज्य सरकारने या समुदायाच्या अधिकारांचे रक्षण केले पाहिजे. अजूनही या समाजाच्या सखोल अभ्यासाची गरज आहे. ते व त्यांची संस्कृती, त्यांची भाषा, त्यांच्या चालीरीती, निसर्गाकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन या सगळ्याचे संरक्षण व संवर्धन झाले पाहिजे हिच अपेक्षा. एकंदरीत भटक्या विमुक्त जाती जमाती मधील माणसांना आत्मसन्मानाने, स्वाभिमानाने जगता यावे यासाठी या समाजातील शिकून शहाण्या झालेल्या पिढीने पुढे येऊन यांना शहाणे करण्याची जबाबदारी उचलणे गरजेचे आहे. अशी एक पिढी कार्यरत होत असताना या समाजाच्या बाबतीत अभ्यास होणे, विचार मंथन होणे गरजेचे आहे, तरच तळागाळातील या समाजाला समता पूर्वक आपलं स्वतंत्र अस्तित्व टिकवता येईल व स्वतःचा विकास साधता येईल.

**संदर्भ ग्रंथसूची:**

1) Bharal, G. P. (1968). De-notified Communities and their Problems of Rehabilitation in Indian. Journal of Social Work, Vol.28 (4), 353-362.

2) Bokil M, (2002).De-notified and Nomadic tribes: A perspective, Economic and Political Weekly, Vol.37, No.2, 148-154.

3) Dilip, D. (2001). Branded by Law. New Delhi: Penguin Books India.

4) Draxe, P. (2005). A failed Revolt against the Raj: the rebellion of the Berad, a Criminal Tribe,under the leadership of UmajiNaik. Sage publication.

5) Jha, A. K. (2010). Formal Education and Pardhi Tribe's Culture in Mulshingi of Maharashtra. AfroAsian Journal of Anthropology and Social Policy Vol.2, 161-165.

6) Mackintosh, C. A. (1833). An Account of the Origin and present condition of the tribe of Ramoossies. American Mission Press.

7) Mane, L. (1997) Upara and After in Upara: An Outsider, (Translated from Marathi by A. K.Kamat), New Delhi: Sahitya Akademi

8) Mehta, B. H. (1955). Ex-Criminal Groups in India. Indian Journal of Social Work, Vol.16 (1) 10-18.

9) Radhakrishna, M. (2001). Dishonored by History: Criminal Tribes and British Colonial Policy. New Delhi: Orient Longman.

10)Thorat, S. (2003). Caste, Exclusion/discrimination and deprivation: The situation of Dalits in India. Delhi, Concept Paper for DFID.

11) National Commission for De-notified, Nomadic and Semi-nomadic tribes ( Renake commission Report 2008)